DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist. Nanded

# Certificate of Publication

*International Recognition Multidisciplinary Research Journal*

ISSN 2249-894X
UGC Approved Journal No. 48514

Impact Factor : 5.2331(UIF)

## *Review of Research*

*This is to certify that our review board accepted research paper of Dr./Shri./Smt.:* प्रा.डॉ.सुनेवार किशन रामलू. *Topic:-* बौध्द कालीन सौंदर्य प्रसाधने. *College :* (इतिहास विभाग प्रमुख), देगलूर महाविद्यालय देगलूर, ता.देगलूर जि.नांदेड. *The research paper is original & innovative.Your article is published in the month of June 2018.*

**...ication**
...413005 Maharashtra India
Contact Detail: +91-0217-2372010 / 9595-359-435
E-mail: ayisrj2011@gmail.com
Website: www.lbp.world

Laxmi Book Publication's

**Authorised Signature**
Ashok Yakkaldevi
Editor-in-Chief

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

Review of Research UGC APPROVED

International Online Multidisciplinary Journal

Volume - 7 | Issue - 9 | June - 2018

Impact Factor : 5.2331(UIF) 2249-894X

# बौध्द कालीन सौंदर्य प्रसाधने



प्रा.डॉ.सुनेवार किशन रामलू

प्रा.डॉ.सुनेवार किशन रामलू

(इतिहास विभाग प्रमुख), देगलूर महाविद्यालय देगलूर, ता.देगलूर जि.नांदेड.

सारांश :आपले शरिर आकर्षक बनविणे किंवा आपले सौंदर्य खुलविणे ही मानवाची [illegible] आहे. .........


Editor - in - Chief - Ashok Yakkaldevi

International Online Multidisciplinary Journal

# Review of Research

Save Tree, Save Paper, Save World


ISSN NO:- 2249-894X Impact Factor : 5.2331(UIF) Vol.- 7, Issue - 9, June-2018




| Sr. No | Title And Name Of The Author (S) | Page No |
|---|---|---|
| 1 | ROLE OF ORGANIC FARMING IN SUSTAINABLE AGRICULTURE DEVELOPMENT: A CASE STUDY OF SHIKARIPURA TALUK, KARNATAKA STATE<br>Ashwini H. Bidaralli | 1 |
| 2 | बौध्द कालीन सौंदर्य प्रसाधने<br>प्रा.डॉ.सुनेवार किशन रामलू | 10 |
| 3 | TEST ANXIETY OF SECONDARY SCHOOL STUDENTS<br>Dr. A.C. Lal Kumar | 15 |
| 4 | A STUDY ON AWARENESS OF MUTUAL FUND INVESTORS TOWARDS INVESTMENT IN MUTUAL FUND<br>Dr. D. Mahesh and S. Sumathy | 18 |
| 5 | कलचुरी नृपती यांच्या काळात धार्मिक परिस्थिती एक दृष्टीक्षेप<br>अमोल भगवानराव आकात | 23 |

REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 9 | JUNE - 2018

# बौध्द कालीन सौंदर्य प्रसाधने



प्रा.डॉ.सुनेवार किशन रामलू
(इतिहास विभाग प्रमुख), देगलूर महाविद्यालय देगलूर, ता.देगलूर जि.नांदेड.

## प्रस्तावना

आपले शरिर आकर्षक बनविणे किंवा आपले सौंदर्य खुलविने ही मानवाची सहजप्रवृत्ती आहे. तसे प्रयत्न प्रत्येक स्त्रि-पुरुष आदीम काळापासुन करीत आलेले आहेत. त्यासाठी अनेक नैसर्गीक सौंदर्य प्रसाधनांचा वापर तो मानूस करीत आला आहे. मानवाच्या त्या प्रयत्नफलश्रुतीस श्रंगार असे म्हणतात. प्रत्येक दिवशी तत्कालीन मानुस अंगाला सुगंधी आलेपन करत होता. चन्दन, काजळ, सुगंधी पदार्थ इत्यादींचा वापर सौंदर्य प्रसाधन म्हणून करीत होता. बौध्दकाळात स्नानानंतर डोळयात काजळ, कपाळावर टिका, आणि अंगाला सुगंधी द्रव्य लावूनच तत्कालीन व्यक्तीचा दिवस सुरु होत होता. प्राचीन काळापासुन भारतीय समाजजीवनात सौंदर्य प्रसाधनाला विशेष महत्व प्राप्त झाले होते असे आपल्याला दिसते. बौध्दकालीन जातककथा, पिटके, दिघनिकाय, मज्झिमनिकाय, चुल्लवग्ग, महावग्ग, थेरगाथा, अर्थशास्त्र, इत्यादी साहित्यांतील वर्णनावरुन आणि उत्खननीत अवशेषांवरुन तत्कालीन लोक कोणती सौंदर्यप्रसाधने वापरीत होते याची माहिती स्पष्टपणे कळते. ती पुढीलप्रमाणे

बौध्दकालीन लोकजीवन व त्यांच्या सांस्कृतीक इतिहासाची माहिती अनेक जातककथातून कळते. तसेच विनयपिटकाचीही बरीच मदत मिळते. जातक कथांमध्ये तत्कालीन लोकांचे जीवन त्यांचे सदाचारी वागने इत्यादी बाबी अतिशय सुंदर वर्णीलेल्या आहेत. बौध्दकाळात राजा, राणी, त्यांचे आप्तेष्ठ, कुटूंबीय, इत्यादी लोक चंदनाने सुवासित केलेल्या राजमहालात राहत होते. राजाच्या श्रंगारासाठी एक विशेष प्रशिक्षीत परिचारक नियुक्त केला जात होता. त्याला 'नापीत' असे म्हटले जात होते. त्याला राज दरबारात मान-सन्मानाचे स्थान होते. तो राजाला स्नान करवित होता. त्यानंतर राजाच्या अंगाला सुगंधी द्रव्य लावत होता. राजाचे केस विंचरुन व्यवस्थित केशरचना तयार करीत होता. [१] स्नान झाल्यानंतर राजा बहुमूल्य वस्त्र- अलंकार धारण करीत होता. त्यात माला, गन्ध, विलेपन, आभुषण इत्यादी होते. [२]

'दिघनिकाय' ग्रंथात श्रंगाराशी संबंधीत वीस बाबी वर्णिलेल्या आहेत त्यांची माहिती पुढीलप्रमाणे

१) उंच्छादानम् - शरिरावर सुगंधी लावणे
२) परिमद्दतिम् - शरिराची मालीश करणे
३) नहापनम् - स्नान करुन शरिर स्वच्छ करणे
४) सम्बाहनम् - शरिर दाबणे
५) आदासम् - आरशात मुख दर्शन करणे
६) अंजनम् - डोळयात काजळ लावणे
७) मालागन्धविलेपनम् - माळा धारण करणे व अंगाला सुगंधी द्रव्य लावणे
८) मुखचुण्णम् - चेहऱ्यावर सुगंधी चुर्ण लावणे
९) मुखालेपनम् - चेहऱ्यावर आलेपन करणे
१०) हत्थबंधनम् - हातावर कंगन वगैरे धारण करणे
११) शिखाबंधनम् - केश बंधन करणे
१२) दन्डम् - दण्ड धारण कणे
१३) नालिकम् - शस्त्र धारण करने (नळीयुक्त)
१४) असिम् - तलवार धारण करणे
१५) छतम् - छत्र धारण करणे

VOLUME - 7 | ISSUE - 9 | JUNE - 2018

१६) उपाहनम् - वाहाना / पादत्राणे धारण करणे
१७) उण्णीषम् - डोक्यावर उण्णीष धारण करणे
१८) मणिम् - मुकूट धारण करणे
१९) वालबिजनिम् - चामरधारिणी
२०) ओदातानी वत्थानी दिघदसानि - अलंकृत श्वेत वस्त्र धारण करणे[३]

'चुल्लवग्ग' ह्या पाली ग्रंथात स्पष्ट उल्लेख आहे की, बौध्दकालीन भिक्षू आणि भिक्षुणिंना साधारण जनमानसाप्रमाणे राहावे लागत होते. वरील उल्लेखित सामग्रींचा वापर करण्याची त्यांना मुभा नव्हती. भिक्षुगण कानात कुन्डल, गळयात हार, हातात बांगडया, अंगठया, बाजुबन्द इत्यादी धारण करीत नव्हते. ते भिख्खू केसांना तेल लावू शकत नव्हते. कंगव्याने केस विंचरत नव्हते. शरिराला विविध आलेपन लावत नव्हते, आरसा वापरत नव्हते, विश्राम करतांना पायात वाहाना व इतर समयी डोक्यावर छत्र धारण करीत नव्हते [४] पण एखादा भिक्षू किंवा भिक्षूणी आजारी पडला असेल तर त्याला शरिरावर व तोंडावर औषधींचे आलेपन करण्याची व आरसा बघण्याची भुमा होती. [५]

## बौध्दकालीन स्नानविधी :-

बौध्दकाळात स्नान करुन शरिर स्वच्छ ठेवणे याला विशेष महत्व होते. त्यामुळे शरिर स्वस्थ राहते तसेच धार्मीक कार्यविधी करणारे लोकही दररोज स्नान करीत होते. 'विनयपिटक' ग्रंथानुसार भारताच्या पुर्वेकडील लोकांमध्ये दररोज स्नान करण्याची परंपरा नव्हती पण अवन्ती व दक्षीण भारतात स्नानाला विशेष महत्व प्राप्त झाले होते. [६] स्नानापुर्वी लोक आपल्या शरिराला सुवासिक चुर्ण लावून शरिर सुगन्धीत करीत होते. वेगवेगळे सुगंधी चुर्ण लावून स्निग्ध स्नानाचा आनंद घेत होते. शरिरावर शिंपडणाऱ्या चुर्णात चंदनाचे चुर्ण हे प्रमुख होते. पण बौध्द भिक्षूंसाठी ते निषिध्द होते. त्याऐवजी भिक्षू आपल्या शरिरावर ओली माती व साळीचा भुस्सा लावुन शरिर घासून घेत होते. भिक्षूंणा त्या मातीत किंवा साळीच्या भुस्स्यात कोणतेही सुगंधी द्रव्य टाकण्याची परवानगी नव्हती.[७]

बौध्दकालीन साधारण लोक आपल्या स्नानविधित कोणताही परिचारक किंवा सेवक यांची मदत घेत नव्हते. नदी, तलाव आणि विहिरींवर स्नान करीत होते. हीच त्यांची स्नानाची प्रमुख स्थाने बनली होती. त्याठिकाणी नगर प्रशासनाद्वारे फरशी, विटा, दगड इत्यादिंनी स्नानस्थाने किंवा घाट बनविले जात होते. तर नगरांमध्ये कांही ठिकाणी स्नानागारेही बनविली होती. त्यातील जलनिकासाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. म्हणजेच बौध्दकाळात हमाम (सार्वजनिक स्नानगृहे) बांधण्याचे प्रचलन होते. [८] 'चुल्लवग्ग' ग्रंथात बौध्द भिक्षूंसाठी सार्वजनिक स्नानगृहे बांधवल्याचे उल्लेख आहेत. सार्वजनिक स्नानगृहात बौध्द भिक्षू मोठया प्रमाणावर स्नानासाठी जात होते. कांही वेळा त्या ठिकाणी स्नानासाठी रांगाही लागत होत्या. त्या स्नानागारांची स्वच्छताही राखली जात होती. स्नानगृहातील व भोवतालची दुर्गंध दूर करण्यासाठी त्यावर सुवासित चूर्ण शिंपडले जात होते. त्या स्नानागारात जाणाऱ्यांनी जाण्यापुर्वी आपल्या तोंडावर व शरिरावर ओली माती घासून पुसून घेण्याची प्रथा होती. त्या स्नानागारात आंघोळीला बसण्यासाठी एक स्नान-पिठीका (Bath Stool) ठेवले जात होते. त्या स्नानागाराला थंड ठेवण्याची व्यवस्थाही केलेली असत.[९]

## शरीराला मालिश करण्याची पध्दत :-

शरिराला आकर्षक, सुंदर बनविण्यासाठी आणि शरिराचा रक्तसंचार सुव्यवस्थीत राहावा म्हणून मालिश करण्याची प्रथा होती. तसेच सुगंधी उटणेही लावले जात होते. मालिश करण्यासाठी विभिन्न सामग्रीचा वापर केला जात होता. मालिश करणारे लोक एका छोटयाशा लाकडाचे उपकरणही बनवत होते आणि त्याद्वारे मालिश करुन घेणाऱ्यांची छाती, मांडया, पोटावर, पाठीवर व शरिराच्या इतर भागावर मालिश करीत होते. त्यामुळे त्या व्यक्तीचा रक्तसंचार सुव्यवस्थीत चालत होता. याशिवाय कांही लोक लाकडाच्या गोलाकार स्तंभाला, गुळगुळीत भितीला, गुळगुळीत उंचवटयावर आपले शरीर घासून मालिश करुन घेत होते. [१०] स्नानागार आणि स्नानस्थळाच्या ठिकाणी कांही दिवाण (लाकडी पलंग) ठेवलेले असत त्यावर सुवासिक पदार्थाचे चूर्ण शिंपडलेले असत. स्नान करणारे लोक त्या दिवाणवर आडवे पडून शिपंडलेल्या चुर्णाने आपले शरिर घासून घेत होते. तसेच तेथे एक छोटेसे मालिश करुन घेण्याचे लाकडी उपकरणही ठेवलेले असत त्याद्वारे आंघोळ करणारे लोक स्वतःचे शरिर घासून घेवून साफ करीत होते. कांही वेळेस त्या अंग घासून घेण्याच्या लाकडी उपकरणाला सुवासीत पदार्थाची पावडरही लावलेली असत. त्याद्वारे शरीर घासून घेवून स्वच्छ करीत होते. [११] आंघोळीच्या वेळेस शरिर स्वच्छ करण्यासाठी जे उपकरण वापरले जात होते त्याला 'कुरुविंदकसुत्ती' असे म्हणत होते. तर पाठ घासण्यासाठी जे उपकरण वापरत होते त्याला 'मल्लक' असे म्हणत होते. [१२] हे दोन्ही उपकरण मकरदन्तक होते. वापरण्यापूर्वी त्या मकर दातांना चिरे पाडले जात होते. पण भिक्षूंसाठीचे मकरदन्तक हे साबूत दाताचे होते. चिरे पाडलेले मकरदन्तक वापरण्याची त्यांना परवानगी नव्हती. [१३] 'चुल्लवग्ग' मध्ये उल्लेख आहे की, बौध्द भिक्षूंनी आंघोळीच्या समयी आपले हात, पाय, पाठ, मांडया, इत्यादी घासून घेण्यासाठी बैलाच्या जबडयाचे हाड वापरले पाहीजे पण भिक्षूर्णीना तेही वापरण्याची परवानगी नव्हती. तसेच बौध्द भिक्षू व भिक्षूणी हे पीळ घातलेली वस्त्रे अंग घासून घेण्यासाठी वापरु शकत होते.[१४]

VOLUME - 7 | ISSUE - | JUNE - 2018

विवीध उत्खनन स्थळांच्या ठिकाणी आंघोळ समयी शरीर घासण्याचे अनेक उपकरण सापडले आहेत. राजघाटच्या उत्खननात मातीने बनविलेले असेच एक उपकरण सापडले, [१५] हस्तिनापूरच्या उत्खननात छोटा दगड व मातीपासून बनविलेले अनुक्रमे गोलाकार व चौकोण आकाराचे असेच उपकरण सापडले.[१६] तक्षशिलाच्या उत्खननातही २.२५ इंच लांब हाडाचे असेच एक उपकरण सापडले आहे. [१७]

अशाप्रकारे बौध्दकाळात स्नानानंतर शरिर स्वच्छ करणाऱ्या वस्त्रांचाही उल्लेख सापडतो त्यास 'उल्लणिया' (टॉवेल) असे म्हणत होते. त्याच्याने शरिर घासून पुसून घेतले जात होते. व अल्पशी शरिराची मालिशही केली जात होती. आंघोळीसाठी थंड व गरम पाण्याचा वापर केला जात होता. आंघोळीनंतर सौंदर्य प्रसाधनांनी शरिर सजविले व रंगविले जात होते. विविध सुगंधी द्रव्य व पदार्थ शरीरावर लावले जात होते. यावरुन तत्कालीन लोक स्नानाला विशेष महत्व देत होते हे स्पष्ट होते.

**स्नानानंतरची सौंदर्यप्रसाधने :-**

स्नानानंतर विविध सौंदर्यप्रसाधनांनी शरिर सजविले जात हाते. तत्कालीन सर्वच सौंदर्यप्रसाधने ही नेसर्गीक होती. काजळ, कुंकू, लाल हरताळ, पिवळे हरताळ इत्यादी. हरताळ हे गरम पाण्याच्या झऱ्यात मिळणारे एक खनिज आहे. काजळही काळे, पिवळे, गेरु अशा विविध रंगाचे असत. त्या काजळांमध्ये तगर (स्वस्तीकाच्या फुलांचा रस), सुवासीक चंदन, कालीयक (पिवळया रंगाच्या सुगंधी लाकडाची पावडर), भद्दमुतक नावाच्या गवतापासून बनविलेले सुगंधी द्रव्य मिसळले जात होते. आणि त्या काजळांना सुवासिक बनविले जात होते. डोळयात काजळ अतिशय काळजीपूर्वक लावले जात होते. डोळयांच्या पापण्यावर व भुवयांवर काजळाची बारीक रेष काळजीपुर्वक ओढली जात होती.[१८] काजळ ठेवण्यासाठी विशिष्ट असे छोटेसे पात्र होते आणि विशिष्ट अशा कांडीनेच ते काजळ लावले जात होते. काजळ ठेवण्याची पात्रे विविध आकाराची व धातूंची बनविलेली होती. समाजातील लोक आपापल्या आर्थीक परिस्थीतीनुसार त्या कांडया विकत घेवून त्यांचा वापर करीत होते. समाजातील श्रीमंत लोक सोने व चांदीचे काजळडब्या वापरत होते तर साधारण लोक लाकडाने बनविलेले, हस्तीदंतीने बनविलेले, प्राण्याच्या शिंगापासून बनविलेले, बांबूपासून बनविलेले काजळडबी वापरत होते.[१९] काजळ लावण्याच्या कांडया विविध धातू व लाकडांच्या आणि विविध आकाराच्या बनविल्या जात होत्या. आवळयाच्या झाडाचीही कांडी बनविली जात होती. काजळ कांडयाची समोरची बाजू गोलाकार असायची. राजघाट येथील उत्खननात २.४ इंच लांब तांबे या धातूची काजळकांडी सापडली. हस्तीनापूर मध्येही धातूची एक काजळकांडी उत्खननात सापडली. तेथेच तांबे धातूचीही काजळकांडी सापडली या दोन्ही काजळकांडया चार इंच लांब होत्या त्याचा समोरचा भाग गोलाकार होता आणि मागचा भाग पकडता येण्यासाठी म्हणून कांहीसा किंचीत गोल बनविला होता. अशाच कांहीशा वेगळया कांडया कान कोरनीसाठी म्हणूनही वापरल्या जात होत्या.[२०]

बौध्दकाळात स्त्रिया आपले सौंदर्य खुलविण्यासाठी विवीध सौंदर्य प्रसाधनांचा वापर करीत होत्या. त्या आपल्या शरिरावयवांना आकर्षक पध्दतीने रंगवत होत्या. अनेक सुगंधी द्रव्यांचे पावडर लावत होत्या. कांही सुगंधी पावडरांचे आलेपण करीत होत्या. 'ब्रह्मजालसुत्त' ग्रंथात उल्लेख आहे की, तत्कालीन स्त्रिया विविध सुगंधी फुलांच्या माळा धारण करीत होत्या.

चेहऱ्यावर सुगंधी पावडर तसेच सुगंधी आलेपण लावून आपले व्यक्तीमत्व खुलवित होत्या.[२१] बौध्दकाळात स्त्रिया सौंदर्य प्रसाधनात काजळ, लोध्रचूर्ण (Symplocos) फुले, कुष्ठ (एक प्रकारचे सुगंधी वृक्ष), अगरुची (त्रीपुराचा राजकिय वृक्ष) पावडर, तगर (स्वस्तीकची फूले) इत्यादीची पाने, फुले, रस, पावडर वापरत होते. तसेच चेहऱ्याला आणि ओठांनाही तेल लावत होते. काजळ कांडी, केश सज्जेसाठी कंगवा, केस बांधण्यासाठी रिबीन, मुखशुध्दीसाठी सुपारी आणि तोंड - ओठ लाल करणारे पान विडाही खात होत्या. आपला चेहरा सजवण्यासाठी व चेहरा पाहण्यासाठी आरसाही वापरीत होत्या. आरसे हे विविध धातूचे बनविले जात होते. आरशांना हस्तीदंतीची, लाकडाची, धातुंची मुठही बसवलेली होती. तत्कालीन लोक आपापल्या आर्थीक परिस्थितीनुसार आरसे विकत घेत होते.[२२]

बौध्दकाळात कांही लोक आपल्या डोळयात काजळ लावत व कानाच्या दिशेने त्याच काजळाची बारीक रेघ ओढत होते. आपले कपाळ ही विविध रंगांनी रंगवत होते. तसेच लाल हरताळ चेहऱ्यावर लावत होते. शरीर आणि चेहरा रंगविण्याची प्रथा होती. स्त्रिया आपले हात-पाय आणि नखांवर लाल रंग लावत होती. त्यासाठी लाख पावडर आणि लाख द्रव्य वापरत होते.[२३] तत्काळात लाख द्रव्य आणि लाख पावडरची समाजात भरपूर मागणी होती. लाखद्रव्य व लाख पावडर बनविण्याच्या उद्योगाला बरेच महत्व प्राप्त झाले होते. मृत व्यक्तीच्या पाठीवर आणि पोटावरही लाख पावडर, चंदन पावडर लावण्याची प्रथा होती. मृत व्यक्तीच्या शरीरावर सुगंधी तेल आणि सुगंधी आलेपनही करीत होते.[२४]

**पुष्प श्रृंगार : -**

बौध्दकालीन लोक फूल माळा, गजरे, गुलदस्ते इत्यादी वापरत होते. त्यासाठी सुवासिक फुलांचा व आकर्षक दिसणाऱ्या फुलांचा वापर फार मोठ्या प्रमाणावर केला जात होता. बौध्द ग्रंथात परिजातकाची फुले, कमळाची फुले, अडहुल (जास्वंदाची फुले), तसेच कांही सुगंधी औषधी वनस्पतीची पाने फूलेही वापरत असल्याचे उल्लेख सापडतात.[२५] तत्काळात फुलांच्या माळा, गजरे, गुलदस्ते बनविणारे कारागीर ही समाजात होते. तो फुलारी वर्ग ऋतुमानानुसार येणाऱ्या सुवासिक फुलांच्या माळा बनवित होता. एका जातकात उल्लेख आहे की, वाराणसीच्या

VOLUME - 7 | ISSUE - 9 | JUNE - 2018

एका महोत्सवात देवपुत्र याने 'कक्कारु' नावाची एक अशी फुलमाळ धारण केली होती की, जीचा सुगंध नगराच्या वेशीपर्यंत दरवळत होता. तसेच फुलारी लोक सुगंधी गवत, मोर पंख, मदन पुष्प, कापसाची कोवळी फुले-देठे, सुगंधी शिंग, शंख, सुगंधी लाकूड, सुगंधी पाने, फुले, कांही सुगंधी बिया, हिरवे गवत इत्यादींचा वापर करुन सुंदर अशा अनेक आकर्षक रंगीन माळा बनवित होते. मथुरामध्ये विरण नावाच्या सुगंधी गवतापासुन पाच रंगाची रंगीन सुगंधी माळ बनविली जात होती. ती माळ विशेष करुन सहवासाच्या वेळी वापरण्यासाठी म्हणुन प्रसिध्द होती. फूलांपासून, पानांपासून शिरोभुषण बनविण्याची प्रथा होती.[११] नाचगाणे करणाऱ्या स्त्रियाही आपले सौंदर्य खुलविण्यासाठी म्हणुन फुलांच्या माळा व गजरे वापरत होते, पानविडा खात होते. जातक कथांमध्ये उल्लेख सापडतो की, स्त्रिया नौकाविहार करतांना फुलांचे श्रृंगार करीत होते. गौतम बुध्दालाही निर्वाण प्राप्तीनंतर विवीध सुगंधी फुलांनी सजविले हाते.[१२]

## सुगंधी द्रव्य पदार्थ -

बौध्दकाळात सुगंधी अत्तर आणि सुगंधी तेलाचा वापरही केला जात होता. काशीचे चंदन त्यासाठी विशेष करुन वापरले जात होते. चंदनापासून सुगंधी तेल आणि त्याची पावडर बनविली जात होती. ते सुगंधी तेल व चुर्ण पावडर तत्कालीन स्त्रिया आपल्या केसात आणि हातावर व शरिरावर आलेपन करीत होत्या.[१३] याशिवाय अलसीचे (जवस) तेल, कुसूम्ब (करडी) चे तेल, सरिसव (सरसो) चे तेल ही केसांना व शरिरावर लावले जात होते. तत्काळात सयपाग व सहस्सपाग नावाचे ओषधीयुक्त तेल, विभीन्न जडीबुटी टाकून बनविले जात होते. अशा विविध औषधीयुक्त तेलांनी मालिश केल्याने शरीराला आराम मिळत होता. आजच्या सारखे त्याकाळात विविध प्रकारच्या सुगंधी जलप्रयोगांची प्रथा होती. त्या सुगंधी द्रव्यात इलायचिचे टरपल, चंदन, जुई फूलाचा रस, जास्मीन फुलाचा रस, केतकी फुलाचा रस, लवंग तेल, कापूर इत्यादी टाकत होते.[१४] या विदिध सुगंधी फुलांच्या रसांनी जे द्रव बनविले जात होते. त्याला 'प्रियंगु' म्हणत होते. त्यात तगर (स्वस्तीक) ची फुले आणि अगरु (त्रीपुराचा औषधी वृक्ष) सुध्दा मिसळले जात होते. अशा विविध फुलांचे सुगंधी रस आणि विविध सुगंधी तेल बनविणाऱ्या गंधीशाला त्या काळात होत्या. त्यात काम करणारे गन्धीक कारागिर त्यांच्या कामात इतके पारंगत होते की कोणत्या तेलात किंवा अत्तरामध्ये कोणकोणत्या फुलांचे रस आहे हे स्पष्टपणे सांगत होते.[१५]

बौध्दकाळात स्त्रि-पुरुष आपली नखेही वाढवत होते. आपल्या नखांचे सौंदर्य वाढविण्यासाठी त्यावर विशेष प्रकारचे आलेपन करीत होते. हस्तिनापुरच्या उत्खननात नखे कट करण्याचे उपकरणही सापडले आहे.[१६]

अशाप्रकारे बौध्दकाळ सौंदर्य प्रसाधनांच्या बाबतीत बराच जागृत आणि प्रगत होता. शरिर सौंदर्याकडे त्यांनी विशेष लक्ष दिले होते. आपले शरिर आकर्षक आणि तंदूरुस्त ठेवण्याकडे त्यांचा विशेष कल होता. पण ह्या मोहमायांमध्ये रमण्याचा अधिकार बौध्द भिख्खूंना नव्हता. त्यांना आपले शरीर सजवण्याचा, तसेच भौतिक सुखाची साधने उपभोगण्याचाही अधिकार नव्हता. सामान्य वर्गाचे आणि त्यावरचे लोकच सौंदर्यप्रसाधनांचा वापर करीत होते. तत्कालीन लोकांनी आपापल्या आर्थिक परिस्थितीप्रमाणे त्या सौंदर्य प्रसाधनांचा वापर केलेला आपल्याला दिसतो.

## संदर्भ ग्रंथसुची :-


१) जातक (संपादक, बी. फॉसबॉल) हिन्दी अनुवाद, भदन्तं आनंद कौसल्यायन, प्रयाग, २०१३, चुल्लसुत्तसोम जात, पृ. १८७.
२) इंडियन कल्चर - जी.पी.मुजुमदार, खंड - १, पृ. ६५१
३) दिघनिकाय-संपादक, रिस डेव्हीडस, (नालन्दा देवनागरी संस्करण) खंड १, ब्रह्मजालसुत्त पृ. १६
४) चुल्लवग्ग - संपादक, भिक्षू जगदिश कश्यप, नालंदा, खंड - ५. भाग - ३, पृ. १-५
५) उपरोक्त - खंड ५, भाग -२, पृ. ५-६
६) सेक्रेड बूक ऑफ द इस्ट - संपादक, एफ मॅक्सम्युलर, वाराणसी, खंड १३, पृ. ४४
७) चुल्लवग्ग - सं. भिक्षू जगदीश कश्यप, खंड - १०, भाग - २७, पृ. ०४
८) ॉस्टयुम, टेक्सटाईल्स, कॉस्मेटिक्स अॅन्ड कॉयफर इन एन्शीएन्ट अॅन्ड मेडीएवल इंडीया - संपादक, एस.पी.गुप्ता , पृ. १९०-९१
९) पुर्वोक्त - ४, खंड ८, भाग १२, पृ. २३
१०) उपरोक्त , खंड ५, भाग २, पृ. २
११) उपरोक्त ५/१/३
१२) उपरोक्त ५/२/६
१३) उपरोक्त ५/१/४
१४) उपरोक्त ५/१/५
१५) द मायनर एन्टीक्वीटीझ ऑफ द एक्सकिवेशन ऑफ राजघाट, मिश्रा जी.एस. पृ. ४८
१६) एन्शीएन्ट इंडिया - बी.बी.लाल , पृ. ८८

१७) तक्षशिला- मार्शल, जॉन, खंड - २, पृ. ६५९
१८) थेरगाथा, संपादक, एच.ओल्डन बर्ग (नालंदा देवनागरी संस्करण), खंड १६, भाग - ४, पृ. ७७२
१९) पुर्वोक्त- ७, ५/२८/२
२०) पुर्वोक्त- १६, पृ. ९५
२१) पुर्वोक्त ८, पृ. १९९
२२) पुर्वोक्त १, कुस. जातक, खंड ५, पृ. ३०२
२३) चुल्लवग्ग- संपादक, भिक्षू जगदीश कश्यप, खंड ५, भाग २, पृ. ५
२४) मस्सक जातक, खंड -२, पृ. १५५
२५) मज्झीमनिकाय, हिन्दी अनुवाद, राहूल सांस्कृतायन, सारनाथ, भाग २, पृ. १५
२६) लाईफ इन एन्शीएन्ट इंडीया अॅज डिपीक्टेड इन जैन कैनन्स- जैन जे.सी. पृ. १०४
२७) दिघनिकाय- संपादक, रिस डेव्हीडस (नालंदा देवनागरी संस्करण) खंड-२, पृ. १००
२८) उम्मदन्ती जातक, खंड-५, पृ. २१५
२९) पुर्वोक्त -२६, पृ. १०४
३०) वेसन्तर जातक, पृ. ५३०, ५३५
३१) एन्शीएन्ट इंडिया - बी.बी.लाल, पृ. ९५

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded